
ज्ञान-विज्ञान विमुक्तये



Peer Reviewed Refered
and UGC Listed Journal

An International Multidisciplinary
Quarterly Research Journal

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | शेतकऱ्यांच्या विकासात शेतकरी संघटनेची भूमिका<br>**डॉ. उल्हास एन. राठोड** | ११७-१२० |
| २८ | बदलत्या पीक आकृतिबंधाचा शेतकऱ्यांवरील परिणाम<br>**डॉ. संतोष तुकाराम कुटे** | १२१-१२५ |
| २९ | मराठवाड्यातील मराठा शेतमजूर<br>**प्रा. डॉ. डोंगे सतीश बाबूराव** | १२६-१२९ |
| ३० | शेतकरी आणि विशेष आर्थिक क्षेत्र<br>**प्रा. डॉ. मधुकर श्रीराम ताकतोडे** | १३०-१३३ |
| ३१ | ग्रामीण साहित्यातील शेतकरी जीवन<br>**प्रा. डॉ. एम. पी. खेडेकर** | १३४-१३८ |
| ३२ | शेती व्यवसायातील महिलांच्या समस्या<br>**प्रा. प्रदीप पंजाबराव ठाकरे** | १३९-१४२ |
| ३३ | जागतिकीकरणाच्या प्रवाहात भारतीय शेतीची स्थिती<br>**डॉ. भालचंद्र रूपराव देशमुख** | १४३-१४९ |
| ३४ | अल्पभुधारक शेतकरी व नाबार्डची किसान क्रेडीट कार्ड योजना : एक आर्थिक अध्ययन<br>**प्रा. गजानन शिवहरी जाने** | १५०-१५५ |

# २९. मराठवाड्यातील मराठा शेतमजूर

**प्रा. डॉ. डोंगे सतीश बाबूराव**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, संत जनाबाई महाविद्यालय, गंगाखेड, जिल्हा – परभणी.

**प्रस्तावना**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून अर्थव्यवस्थेच्या विकासात कृषि क्षेत्राचा वाटा महत्त्वपूर्ण आहे. शेती उत्पान्नाच्या बाबतीत भारत आज स्वंयपूर्ण बनला आहे. शेती उत्पादनासाठी महत्त्वाच्या असणा-या साधनांपैकी श्रम एक महत्त्वाचे साधन मानले जाते म्हणूनच श्रम करणारे शेतमजूर एक महत्त्वाचे भांडवल आहे. प्राचीन काळात वर्ग अस्तित्वात नव्हता. परंतू शेतीवर लोकसंख्येचा वाढता भार, शेतक-यांचा कर्जबाजारीपणा, ग्रामीण भागातील लघू व कुटीरउद्योचा ऱ्हास इत्यादी कारणातून २० व्सा शतकात भूमिहिन मजूरांचा एक मोठा वर्ग उदयास आला. आज हाच शेतमजूर वर्ग भारतीय शेती अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक असूनही अत्यंत दारिद्री व मागासलेला आहे. रात्रंदिवस दुस-याच्या शेतात काम करुन अर्ध्या भाकरीसाठी राबणा-या शेतमजूराला अनेक समस्यांना सामारे जावे लागते. भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतमजूराचे महत्व लक्षात घेण्यासाठी तसेच त्यांच्या समस्या माहित करुन घेण्यासाठी व त्या समस्यांच्या निराकरणासाठी भ्ससात सरकारच्या मजूर व रोजगार मंत्रालयाने मध्यवर्ती संघटनेच्या सहकार्याने व इतरही संघटनेचीमदत घेऊन शेतमजूरांच्या आर्थिक स्थितीच्या चौकशीसाठी १९५०-५१ सालीपहिल्या शेतमजूर चौकशी समीतीची तर १९५६-५७ मध्ये दुस-या शेतमजूर चौकशी समितीची स्थापना केली होती. एवढेच नाही१९६४-६५ मध्ये ग्रामीण मजूर चौकशी समिति, भगवती समिती यासारख्या समित्यांची स्थापना केली आहे. या समित्यांनी शेतमजूरांच्या स्थितीचा अभ्यास करुन उपाययोजना सुचविल्या आहेत. यापैकी काही उपायांची शासनाकडून अंमलबजावणी केली गेली. परंतू शेतमजूरांच्या आर्थिक स्थितीत फारशी सुधारणा झालेली दिसून येत नाही.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत अध्ययनासाठी दुय्यम तथ्यांच्या आधारे अध्ययन केले आहे. यामध्ये प्रामुख्याने संशोधकाने मराठा आणि लिंगायत समुदायाचे आर्थिक अध्ययन केले असल्याने अध्ययनासाठी मराठवाड्यातील शेतमजूरांच्या समस्यांचे अध्ययन केले आहे.

**शेतमजूराची व्याख्या**

शेतमजूर दुस-याच्या शेत जमिनीवर उपजिवीकेचे साधन मिळविण्याच्या उद्देशाने काम करतो.

**मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर**

भारतात केलेल्या वेगवेगळ्या अध्ययनावरून भारतात भूमिहीन शेतमजूरांची संख्या कशी वाढत आहे हे स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्रातही भूमिहीन शेतमजूरांची संख्या लक्षणीय आहे. महाराष्ट्रात मराठा या जातीचे प्रमाण सर्वात अधिक आहे.

वेगवेगळ्या अभ्यासकांनी मराठा जातीची महाराष्ट्रात नेमकी किती लोकसंख्या आहे. याबाबत विविध विचार मांडलेले आहेत. या सर्व अभ्यासकांच्या विचारावरुन आज महाराष्ट्रात मराठा जातीची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ३२ टक्के आहे असा निष्कर्ष काढता येईल. देशातील कोणत्याही राज्यात एका जातीचे एवढे मोठे प्रमाण दिसून येत नाही. या जातीचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. या मराठ्यांपैकी सुमारे ९५ टक्के मराठा समाज शेतीवर उपजिवीका करतो. यापैकी ८५टक्के शेती कोरडवाहू असल्यामूळे निसर्गावर अवलंबून आहे. यामुळे या शेतक-यांचे जीवन परावलंबी बनले आहे. या शेतीशिवाय शेतीपूरक इतर व्यवसायही या जातीमध्ये केले जातात. शेती सोंडून इतर क्षेत्रात या जातीच्या लोकांचे प्रमाण मात्र नगण्य आहे.

मराठा समाज खानदानी पंरपरेला फार महत्त्व देतो. ढोबळ मानाने मराठा समाजातही अंतर्गत विभागणी आहे. देशमुख, पाटील, शेतमजूर, कुणबी ही विभागणी पारंपारिक आहे. म्हणजेच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मराठा समाजात नवे वर्गीय गट निर्माण झालेलेदिसतात.

१) सत्तेवर असलेला मराठा वर्ग
२) राजकारणात असणारा मराठा वर्ग
३) बागायती शेती असलेला मराठा वर्ग
४) कोरडवाहू शेती असलेला मराठा वर्ग
५) अल्पभूधारक मराठा वर्ग
६) नोकरदार,पगारदार मराठा वर्ग
७) भूमिहीन आणि शेतमजूर मराठा वर्ग

या वर्गामध्ये भूमिहीन शेतमजूरांचा मोठावर्ग आहे. एकीकडे जमीनदार म्हणून मराठा जातीला ओळखले जाते तर दुसरीकडे याच जातीत भूमिहीन शेतमजूरांचे प्रमाण अधिक दिसते. आजघडीला मराठा जातीत दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन शेतमजूरांचे प्रमाण ४० टक्के आहे. २०११ च्या सामाजिक आर्थिक जणगणनेचा अहवाल नुकताच केंद्र सरकारने प्रसिद्ध केला आहे. या अहवालामध्ये ग्रामीण भागातील भयंकर वास्तवसमोर आले आहे. या अहवालानुसार ग्रामीण भागात एकूण लोकसंख्येच्या ७३ टक्के लोकसंख्या असल्याचे दिसून आले. या लोकसंख्येपैकी ५६ टक्के लोक भूमिहीन आहेत. तर ग्रामीण भागातील ५१ टक्के लोकसंख्येची उपजीविका मजूरीवर अवलंबूंन आहे असे स्पष्ट झाले आहे. याचाच अर्थ आज ग्रामीण भागामध्ये भूमिहीन शेतमजूरांचे प्रमाण अधिक आहे व त्यांच्या उपजिविकेचे एकमेव साधन मजूरी हेच आहे. मराठा जातीच्या लोकांचे वास्तव्य ग्रामीण भागामध्ये अधिक आहे. २०११ च्या सामाजिक, आर्थिक जणगणना अहवालानूसार ग्रामीण भूमिहीनाचे प्रमाण ५६ टक्के आहे. म्हणून महाराष्ट्र राज्याच्या ग्रामीण भागामध्ये सर्वाधिक संख्या मराठा जातीची असल्यामुळे जातीमध्येही मोठ्या प्रमाणावर लोक भूमिहीन आहेत. असे या अहवालावरुन म्हणता येते. वेगवेगळ्या संघटनेच्या मतानूसार महाराष्ट्रात मराठा जातीत असणा-या ६० टक्के लोक हे अल्पभूधारक आहेत. तर १५ टक्क्यांच्यावर लोक हे भूमिहीन आहेत. या जातीत असणा-या अल्पभूधारांकांचीही वाटचाल भूमिहीनांच्या दिशेने चालू आहे. या भूमिहीन लोकांच्या उदरनिर्वाहाचे साधन दुस-याच्या शेतीवर

काम करणे हेचे राहिलेलेआहे. राज्यशासनाने केंद्रशासनाच्या आम आदमी विमा योजनेसाठी भूमिहीनाची मर्यादाही कोरडवाहू ५ एकरपेक्षा कमी व बागायती अडीच एकर पेक्षा कमी अशी केली आहे. यानूसार कोरडवाहू ५ एकर व बागायती अडीच एकर जमीन असणारा वर्ग हा भूमिहीन मानला जातो. राज्यशासनाच्या या निर्णयानुसार विचार केल्यास मराठा जातीतील साठ टक्केपेक्षा अधिक व्यक्ती ह्या भुमिहीन ठरतात.

गेल्या दोन-अडीच दशकापर्यत मराठा जातीतील व्यक्तीकडेकाहीप्रमाणात जमीन होती. परंतू विविध कारणांमूळे त्यांच्यावर आज भूमिहीन होण्याची वेळ आली आहे. यामध्ये लोकसंख्या वाढ, जमिनीचे विभाजन व तूकडीकरण, कर्जबाजारीपणा, शेतमाल प्रक्रिया उद्योगाचा अभाव, विभक्त कुटुंबापद्धती, भांडणे-भाऊबंदकी यासारखी काही कारणे सांगता येतील. या बरोबरच शिक्षणाकडे दुर्लक्ष, व्यसनाधिनता ही कारणेही भूमिहीन होण्याला कारणीभूत ठरली आहेत. कोणत्या का कारणाने होईना मराठा जातीतील एकमोठा वर्ग आज भूमिहीन ठरलाआहे हे वास्तव्य आहे व हे वास्तव कोणालाही नाकारता येणारे नाही. आज भूमिहीन शेतमजूरांची अवस्था दयनिय, केवीलवाणी बनली आहे. रोजगाराचा दुसरा कोणताच पर्याय नसल्यामुळे मराठा जातीतील भूमिहीन व्यक्ती दुस-याच्या शेतीवरच मजूरी करत आहे. यामध्ये शेतमजूरी करणा-या स्त्रियांचे प्रमाणही लक्षणीय आहे. प्रत्येक गावात डोकावून पाहिले तर असे लक्षात येते की, गोर-गरीब मराठ्यांचे प्रमाण खूपच जास्त आहे. बहूसंख्य मराठा जात आज दारिद्रयात वावरते आहे.

शेतक-यांचा आसुड या ग्रथांत म.फुलेनी शेतक-यांच्या परिस्थितीचे जे वर्णन आहे ते तसेच्या तसे महाराष्ट्रातल्या गावागावात राहणा-या शेतकरी जातीचे आहे. याला मराठा जात अपवाद नाही. मराठा जातीतील भूमिहीन शेतमजुरांची स्थिती यापेक्ष वेगळी नाही. मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर आज प्रबोधनापासून खूप दूर आहेत. आपल्या मुलांना जातीतील जे शिक्षण सुद्धा देऊ शकत नाहीत. असज, ज्ञान, सत्ता, संपत्ती आणि सन्मान यापासून मराठा जातीतील हे भूमिहीन शेतमजूर वंचित आहेत. मराठा जातीतील श्रीमंत व्यक्तीकडून ते कायम दुर्लक्षिले जात आहे. राजकीय नेत्यांकडून निवडणूकीपूरता वापर या शेतमजुरांचा करुन घेतला जात आहे. मराठा जातीतील भूमिहीन, अल्पभूधारक लोक आज दारिद्रय रेषेखालील जीवन जगत आहेत. कधी काळी धराच्या बाहेर न पडणारी मराठा स्त्री आज घराबाहेर पडून शेतमजूर म्हणून काम करु लागली आहे. रोजगार हमीसारख्या कामावर आज प्रतिष्ठित कुटुंबातील स्त्रिया काम करु लागल्या आहेत. भूमिहीन शेतमजूर मुलांना शिक्षण देऊ शकत नाहीत, शिकवलेच तर त्यांना नोकरी मिळत नाही. उद्योग, व्यवसाय यांची माहिती नाही वा त्यासाठी लागणारे भांडवल या शेतमजुरांजवळ नाही. यातून बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर या शेतमजूरांमध्ये निर्माण झालेली आहे. आज तर या शेतमजूरांच्या बेरोजगार मुलांना कुणी मुली देत नाहीत. यामुळे या मुलांच्या विवाहाचा एक वेगळाच प्रश्न निर्माण झालेला आहे. अशी मुले मराठा जातीत आज मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहेत. या मुलांच्या विवाहाचा एकं नवीनच प्रश्न मराठा जातीपुढे उभा राहीला आहे. यावरुन मराठा जातीतील भूमिहीन शेतमजुरांची परिस्थिती किती दयनीय, हलाखीची आहे हे स्पष्ट होते. याचाच अर्थ, मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर आज आर्थिक दुरावस्थेत आहे. मसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्याही मागास आहेत व अशा मागासलेपणाच ते अनेक वर्षापासून जीवन जगत आहे.

**सारांश**

शेतमजूर मुख्यतः शारिरीक श्रमकरणारा वर्ग होय. या शेतमजूरांना ३००० कॅलरिल व ८५ ग्रॅम प्राटिन्स दररोज मिळणे आवश्यक असते. पण प्रत्यक्षात शेतमजूरांना तेवढे अन्नधान्यमिळत नाही, शेतमजूरीचे दर अल्प आहेत. अशा अल्प मजूरीमध्ये त्यांना आपले जीवन व्यवस्थीत जगता येत नाही. ज्यातल्या त्यात स्त्री शेतमजूराला मिळणारी मजूरी तर खूपच कमी असते. एवढेच नाहीतर बारा महीने काम मिळलेंच याची शाश्वती नसते. जेव्हा काम मिळत नाही तेव्हा या शेतमजूरांना घरीच बसून राहावे लागते. दुस-या शेतमजूर चौकशी समितीच्या अहवालानूसार १९५६-५७ मध्ये शेतमजूर कुटुंबाचे सरासरी वार्षिक उत्पन्न ३८५ रु. ३८ पैसे एवढे होते. तसेच नॅशनल सॅम्पल सर्व्हेनुसार १९६३-६४ मध्ये शेतमजुरांच्या कुटुंबांचे सरासरी वार्षिक उत्पन्न ६६० रु.१९ पैसे होते. १९५६-५७ मध्ये याच शेतमजुरांचे दरडोई एकदिवसाचे उत्पन्न २४ पैसे होते. १९६३-६४ मध्ये ते ४० पैशापर्यत वाढले. या सर्वेक्षणाप्रमाणेच मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूरांची परिस्थिती आहे. यावरुन भूमिहीन शेतमजुरांच्या दारिद्रयाच्या स्थितीचे वास्तव चित्र उभे राहते. एकिकडे या शेतमजूरांचे पुरेसे उत्पन्न नसतानांही भरपूर खर्च करुन पारंपारिक प्रथा, रिती-रिवाज, सन - उत्सव साजरा करण्यात याच व्यक्ती पुढे आहेत. यावेळी आपल्या कुवतीचा विचार केला जात नाही. यातूनच कर्जबाजारीपणा वाढीस लागला आहे. तर दुसरीकडे तो आपल्या मुलांना बरोबर शिक्षण देऊ शकत नाही की, त्यांच्या विकासासाठी संधी उपलब्ध करुन देऊ शकत नाही.

**संदर्भ ग्रथ**

१. ब्रम्हे सुलभा (१९८३),महाराष्ट्रातील शेतमजरू, फुले समता प्रतिष्ठान, भवानी पेठ, पुणे.

२. जगताप राम (२०१२), मराठा समाज वास्तव, राजहंस प्रकाशन, पुणे.

३. कटमुसरे एस.बी. (२०११)., महाराष्ट्राचा कृषी विकास., पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.

४. पाटील कायंदे, शेतीचे अर्थशास्त्र, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक.